# प्रेस नोट

## श्री. चंद्रकांत पाटील, मा. मंत्री, (सा.बां.) यांचे निवेदन.

दिनांक १०.०४.२०१५ रोजी मा. मुख्यमंत्री महोदयांनी विधानसभेत सन-२०१५ चे पहिल्या (अर्थसंकल्पिय) अधिवेशनात "सार्वजनिक बांधकाम विभागाकडील ३८ पथकर स्थानकांपैकी ११ पथकर स्थानके व महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडील ५३ पथकर स्थानकांपैकी १ पथकर स्थानक अशी एकूण १२ पथकर स्थानके दिनांक ३१ मे, २०१५ रोजी मध्यरात्री १२.०० वाजता बंद करण्यात येत आहेत, तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाकडील उर्वरित २७ पथकर स्थानके व महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडील २६ पथकर स्थानके अशा एकूण ५३ पथकर स्थानकांवर कार, जीप व महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या बसेसना दिनांक ३१ मे, २०१५ रोजी मध्यरात्री १२.०० नंतर पथकरातून सूट देण्यात येत आहे." अशी घोषणा केली.

त्याअनुषंगाने सार्वजनिक बांधकाम विभागाकडील ११ पथकर स्थानके व म.रा.र.वि. महामंडळाकडील १ पथकर स्थानक दिनांक १ जून, २०१५ पासून बंद करण्याबाबत तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाकडील २७ व म.रा.र.वि. महामंडळाकडील २६ अशा एकूण ५३ पथकर स्थानकांवर कार, जीप व महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या बसगाड्यांना दिनांक १ जून २०१५ पासून पथकरातून सूट देण्याबाबत शासन निर्णय राजपत्रात दिनांक २८/०५/२०१५ रोजी प्रसिद्ध करण्यात आले आहेत. बंद केलेली १२ पथकर स्थानके आणि कार, जीप व महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या बसगाड्यांना सूट दिलेली ५३ पथकर स्थानकांची यादी सोबत जोडली आहे.

- उपरोक्त ५३ पथकर स्थानकांवर **कार, जीप व महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या बसगाड्यांना ये-जा करण्यासाठी स्वतंत्र दोन मार्गिका ठेवण्यात याव्यात** अशा प्रकारच्या सुचना संबंधिताना देण्यात आल्या आहेत.
- उपरोक्त ५३ पथकर स्थानकांवर ठळक अक्षरात **"कार, जीप व महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या बसगाड्यांना पथकरातून सूट" अशा आशयाचे फलक** लावण्याबाबत सुचना दिलेल्या आहेत.

(चंद्रकांत पाटील)
मंत्री, सार्वजनिक बांधकाम.